# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 26/03/2018 रोजी (का.प.क्र.22) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

सोमवार दिनांक 26 मार्च 2018 रोजी (का.प.क्र .22) मा.सभापती श्री.गजानन रामकिसन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 04-40 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.नवल किशोर राम,भा.प्र.से, नगरसचिव श्री.डी डी सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
02. स.स.श्री.सिताराम इसराम सुरे
03. स.स.श्री.ऋषिकेश चंद्रकांत खैरे
04. स.स.सिध्दांत संजय शिरसाट
05. स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
06. स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले
07. स.स.श्री.सोहेल शकिल शेख
08. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
09. स.स.श्रीमती मनिषा बालाजी मुंडे
10. स.स.श्री.सय्यद मतीन रशिद
11. स.स.श्रीमती शेख नरगीस सलिम
12. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
13. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे

**विषय क्र. 347 :**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 अन्वये मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे सादर केलेल्या सन 2017-2018 चे सुधारीत व कलम 95 अन्वये सादर केलेल्या सन 2018-2019 या वर्षीचे मुळ जमा व खर्चाचे अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे.

मा.सभापती : आज स्थायी समिती समोर मा.आयुक्त यांनी सन 2017-18 चे सुधारीत व या वर्षाचे मुळ अर्थसंकल्प सादर करणार आहे.

लेखाधिकारी (श्री.पवार): मा.आयुक्त हे सन 2017-18 चे सुधारित व सन 2018-19 चा मुळ अर्थसंकल्प मा.सभापती स्थायी समिती यांचेकडे सादर करणार आहे. तत्पुर्वी मा.आयुक्त यांनी मा.सभापती स्थायी समिती यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करावे. तसेच स्थायी समितीचे सर्व स.सदस्य यांचे मुख्य लेखाधिकारी श्री.पाटणी हे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतील.

यावेळी मा.आयुक्त यांनी मा.सभापती यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तसेच प्र.मुख्यलेखाधिकारी श्री.पाटणी यांनी स.सदस्य यांचे स्वागत केले.

लेखाधिकारी (श्री.पवार) :मा.आयुक्त यांना विनंती की त्यांनी मा.सभापती यांचेकडे अर्थसंकल्प सादर करावा.

या वेळी मा.सभापती स्थायी समिती यांचेकडे मा.आयुक्त अर्थसंकल्प सादर करतात.

या वेळी मा.आयुक्त यांनी जमा बाजू व खर्च बाजू संदर्भात सभागृहात पावर पॉईन्ट प्रेज़ेन्टेशननुसार माहिती दिली.

मा.आयुक्त :महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949चे कलम 103व104 नुसार 2017-2018 चे सुधारित व कलम 95 अन्वये सन 2018-2019 या आर्थिक वर्षासाठी महापालिकेच्या स्थापनेनंतरचा 36 वा आणि आयुक्त म्हणुन माझ्या कारकिर्दीतील पहिले जमा व खर्चाचे आर्थिक अंदाज मा.स्थायी समिती समोर सादर करतांना आनंद होत आहे.

महानगरपालिकेचे वार्षिक अंदाज तयार करतांना शहरातील सर्वच घटकांसाठी योग्य व पुरेशी आर्थिक तरतुद करणे हे माझे प्रमुख ध्येय आहे. यासाठी उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करणे, अस्तित्वातीन स्त्रोतांना शोधून त्या पासूनचे उत्पन्नात वाढ करणे, यासाठी प्रयत्न करणे अनिवार्य असुन सदरचे काम करण्यासाठी माझा प्राधान्यक्रम राहील.

मालमत्ता कर उद्दिष्टानुसार वसुली न झाल्यास त्याचा विपरीत परिणाम शहरातील विकास कामांवर होवू शकतो याची प्रशासन प्रमुख म्हणुन मला पुर्ण जाणीव आहे. ही बाब विचारात घेवून 01 एप्रिल-2018 पासुनच मालमत्ता कराची वसुली उद्दिष्टानूसार होण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे. यासाठी आपल्या सर्वांचे पुर्ण क्षमतेने सहकार्य अपेक्षित आहे. उद्दिष्टाप्रमाणे वसुलीसाठी वार्ड निहाय अति सुक्ष्म घटक (Micro planning) विचारात घेवून दररोज पध्दतीने कर्मचाऱ्यांना उद्दिष्ट देण्यात येणार आहे. यासाठी वार्ड कार्यालया अंतर्गत असलेल्या मालमत्ता यांचे व्यावसायिक व रहिवाशी याप्रमाणे विभागणी करुन वार्डात कार्यरत वसुली कर्मचारी यांच्या संख्येप्रमाणे मालमत्तांचे वाटप करण्यात येवून वर्षातील कार्यदिवसा प्रमाणे (Working Days) दिवस निहाय (Daily Basis) उद्दिष्टाप्रमाणे वसुली बाबत दैनंदिन आढावा घेण्यात येईल. यासाठी सर्व वार्ड कार्यालये, सर्व प्रमुख पदाधिकारी यांचे दालनासोबत नेटवर्कीग अंतर्गत जोडण्यात येतील. जेणेकरुन वसुली कामकाजावर ते सुध्दा लक्ष ठेवू शकतील.

शहराची अपेक्षित वाढ बघता खुप झपाट्याने या शहरात नागरीकरण होत आहे. तसेच सातारा-देवळाई या ग्रामपंचायतीचा समावेश औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत झालेला आहे. या भागासह नविन वसाहतींना मालमत्ता कर आकारणी करुन महानगरपालिकेचे महसुली उत्पन्न वाढविण्यासाठी व्यापक स्तरावर मालमत्ता कर आकारणी मोहीम हाती घेता येईल.

स्थानिक संस्था कर हे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत होते, जुलै 2017 पासुन केंद्र शासनाने वस्तू व सेवा कर लागु केल्यामूळे स्थानिक संस्था कर रद्द करण्यात येऊन त्यापासुन येणारी तुट भरुन काढण्यासाठी महाराष्ट्र शासन महानगरपालिकेस अनुदान वितरीत करीत आहे.

**जमा बाजु:-**

**1) स्थानिक स्वराज्य संस्था कर:-**

सन 2017-2018 या वित्तीय वर्षात प्रशासनामार्फत स्थानिक संस्था करापोटी रु.275.00 कोटीचे उद्दिष्ट निश्चित केले होते. सन 2018-2019 या आर्थिक वर्षाकरीता स्थानिक संस्था करापोटी रु. 330.00 कोटीचे उद्दिष्ट ठरविण्यात येत आहे.

**2) मालमत्ता कर :-**

सन 2018-2019 या आर्थिक वर्षाकरीता मालमत्ता करापोटी रु.300.00 कोटीचे उद्दिष्ट ठरविलेले आहे. सन 2017-2018 या वर्षात प्रशासनाने मालमत्ता करापोटी रु.230.00 कोटीचे उद्दिष्ट निश्चित केले होते.

**3) नगर रचना विभागापासुन प्राप्त होणारे उत्पन्न:-**

सन 2017-18 करिता नगर रचना विभागास प्राप्त उत्पन्न विचारात घेऊन सुधारीत उद्दिष्ट रु.85.00 कोटी निश्चित करण्यात आलेले असुन, सन 2018-2019 करीता रु.115.00 कोटीचे उद्दिष्ट ठरविण्यात येत आहे.

**4) जमा बाजु** मध्ये शासकीय अनुदाने व खर्च प्रतिपुर्ती, शाळा इमारत भाडे अनुदान पाणीपट्टी वसुली तसेच महानगरपालिकेच्या मालमत्ता पासुन प्राप्त होणारे उत्पन्न सन 2018-2019 च्या प्रस्तावित अर्थसंकल्पातील अपेक्षीत खर्चाच्या ठळक बाबी :-

**1. प्रशासकीय विभाग:-**

सन 2017-2018 या आर्थिक वर्षात एकुण रू.246.10 कोटी इतका प्रशासकिय खर्च प्रशासनाने प्रस्तावित केला होता, सदर खर्चात प्रामुख्याने अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते व इतर प्रशासकीय खर्चाचा समावेश होता. सन 2017-2018 चा सुधारीत प्रशासकीय खर्च रु.220.55 कोटी इतका प्रस्तावित केलेला आहे.

तसेच सन 2018-2019 या आर्थिक वर्षासाठी र.रु.265.05 कोटीचा खर्च प्रशासनाने प्रस्तावित केलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी र.रु.235.25 कोटी, अग्निशमन विभागाकरीता गणवेश व अनुषंगिक साहित्य खरेदी पोटी रु.25.00 लक्ष, कर्मचाऱ्यांचे वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती पोटी र.रु.75.00 लक्ष, अभिलेख कक्ष Digitisation खर्च पोटी र.रु.50.00 लक्ष, रस्त्यामधील बाधीत अतिक्रमणे काढण्याच्या कामासाठी बंदोबस्त

प्रित्यर्थ पुर्वी घेण्यात आलेल्या पोलीस दलाचे थकीत देयके अदा करण्यासाठी र.रु.50.00 लक्ष, कार्यालयीन इमारतीच्या विद्युत देयक खर्चापोटी रु.3.50 कोटी, वाहन इंधनापोटी र.रु.5.50कोटी, वाहन देखभाली पोटी र.रु.1.50 कोटी, Outsourcing Salary साठी र.रु.12.00 कोटी इत्यादीचा समावेश आहे. तसेच जमा बाजुमध्ये आणखी विद्युत विभाग, नवीन रस्ते बांधणी, पुर्नडांबरीकरण व पॅचवर्क, आदर्श रस्ते, विशेष शासकीय अनुदानातून रस्ते विकास, डिफर पेमेंट तत्वावर रस्ते उभारणी, जलनिस्सा:रणाची नवीन कामे, जलनिस्सा:रण देखभाल दुरूस्ती,उद्याने विकास,घनकचरा व्यवस्थापन,शहरातील नागरीकांना आरोग्य सुविधा देणे, शिक्षण विभाग सुविधा पुरविणे, क्रिडा विभाग, महिला व बालकल्याण विभाग, दिव्यांग व्यक्तींसाठी कल्याणकारी योजना राबविणे, अग्निशमन विभाग, प्रधानमंत्री आवास योजना, नावीन्यपुर्ण संकल्पना, स्मार्ट सोल्युशन, हेरिटेज वास्तु संवर्धन, नाट्यगृह नुतनीकरण, पाणी पुरवठा व्यवस्था, कर्ज परतफेड, इ. कामांवर खर्च करावा लागणार आहे.

करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 नुसार सन 2017-2018 चे सुधारित अंदाज जमा रु. 787,45,55,000/- यामध्ये प्रारंभीची शिल्लक रु.62,98,27,000/- यासह एकुण जमा रु.850,43,82,000/- आणि एकुण खर्च रु. 816,43,60,000/- लक्षात घेता रु.34,00,22,000/- शिलकीचे सुधारीत अर्थसंकल्प मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

त्याच प्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 नुसार सन 2018-2019चे जमा व खर्चाचे मुळअंदाज यामध्ये प्रारंभीची शिल्लक रु.34,00,22,000/- व अपेक्षित जमा रु.1240,70,50,000/- असे एकुण रु.1274,70,72,000/- आणि अपेक्षित खर्च रु.1274,53,95,000/- विचारात घेता रु.16,77,000/- शिल्लकीचे जमा व खर्चाचे अंदाज मा.स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

माझ्या कार्यकाळात मा. सभापती, विधानसभा महाराष्ट्र राज्य श्री.हरीभाऊजी बागडे, मा.सार्वजनिक आरोग्यमंत्री,महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री,औरंगाबाद डॉ.दिपकजी सावंत, मा.खासदार श्री.चंद्रकांतजी खैरे,मा.खासदार श्री.रावसाहेबजी दानवे, मा.खासदार राज्य सभा, श्री.राजकुमारजी धुत, मा.आमदार श्री.संजयजी शिरसाट, औरंगाबाद (पश्चिम), श्री.अतुलजी सावे औरंगाबाद (पुर्व), मा.आमदार श्री.इम्तियाजजी जलील औरंगाबाद (मध्य), तसेच विधान परिषद सदस्य मा.आमदार श्री.सतीष चव्हाण, मा.आमदार श्री.सुभाषजी झांबड, मा.आमदार श्री.विक्रमजी काळे यांचे सहकार्य व मागदर्शन लाभेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

तसेच मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती स्थायी समिती, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्ष नेता तसेच सर्व पक्षाचे गटनेते व स.सदस्य यांचे सुध्दा सहकार्य मला लाभेल याचा मला पूर्ण विश्वास आहे.

सर्व पत्रकार बंधु, इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे व औरंगाबाद आकाशवाणी इत्यादी सर्व महानगरपालिकेच्या लोकाभिमुख प्रकल्प व विकास योजनांना प्रसिध्दी देऊन महानगरपालिकेस सहकार्य करतील, या अपेक्षेसह सर्वांचे धन्यवाद!

| | |
|---|---|
| मा.सभापती | :मा.आयुक्त यांनी कमी कालावधीमध्ये चांगले बजेट सादर केले आहे. सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो. एकूण रू.1274.70 कोटीचे बजेट सादर केलेले आहे अपेक्षीत खर्च विचारात घेता 16.77 लक्ष शिल्लकीचे जमा व खर्चाचे अंदाज स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी सादर केलेले आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :आताच बजेट सादर केले त्यावर अभ्यास करणेसाठी वेळ दयावा यावर नंतर सभा आयोजित करावी. |
| श्रीमती किर्ती शिंदे | :अर्थसंकल्पावर अभ्यास करणेसाठी वेळ दयावा नंतर सभा घेण्यात यावी. |
| श्री.सिताराम सुरे | :विषयावर चर्चा करायची आहे 4-8 दिवसानंतर सभा घेण्यात यावी. |
| श्रीमती मनीषा मुंढे | :प्रशासनाने चांगले बजेट सादर केले यावर.नंतर सभा घ्यावी. |
| श्रीमती स्वाती नागरे | :यावर अभ्यास करणेसाठी वेळ दयावा नंतर सभा घेण्यात यावी. |
| मा.सभापती | : दुरूस्तीसह मंजूर करण्यांत येत आहे. |

**ठराव :**

प्रशासनाने सादर केलेल्या जमा व खर्चाच्या मुळ अंदाजावर सर्व सन्माननीय सदस्य यांनी सर्वंकष अभ्यास करून चर्चा केली सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेता शहरातील नागरीकांच्या मुलभुत गरजा व त्यांना पुरविण्यात येणाऱ्या आवश्यक सुखसुविधा विचारात घेता, या अर्थसंकल्पामध्ये सर्व समावेशक प्रभागात विकास कामे करण्याचा सर्व सदस्यांचा मोठ्या प्रमाणावर मानस आहे. तथापी महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत नाजुक असून सुध्दा वरील सर्व बाबींचा विचार करून सन्मानिय सदस्यांच्या वार्डामध्ये नागरी सुविधा पुरविण्याच्या भावनेतून विकास कामे करण्यासाठी जमा बाजूच्या अंदाजामध्ये वाढ सुचविण्यात येऊन देखभाल दुरूस्ती व विकास कामांचा समावेश अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेला आहे.

स्मार्ट सिटीच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये महानगरपालिकेचा समावेश झालेला असून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कराची वसुलीची टक्केवारी 80% होणे आवश्यक आहे. शहरात जी.पी.एस. प्रणालीद्वारे मालमत्ता करात वाढ करण्याचा मानस आहे व या करीता सदर प्रणालीद्वारे सर्वेक्षण करण्यासाठी विशेष तरतुद करण्यात आलेली आहे. दरम्यानच्या काळात मालमत्ता कराच्या वसुलीमध्ये सुसूत्रता यावी व प्रभावीपणे वसूली करून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रशासनाने सर्व विभागातील कार्यरत कर्मचारी यांचा आढावा घेऊन या विभागासाठी वाढीव व आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्यात यावा व त्यांच्याकडून वसूली वाढविण्यासाठी प्रयत्न करावे. मालमत्ता कराचे संगणकीकृत मागणीपत्रे मे -2018 अखेर वाटप करण्यात येऊन मालमत्ता कर वसुली उद्दिष्टानुसार करण्यात यावी.

स्थायी समितीच्या वतीने शहरातील सर्व नागरीकांना अशी विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्याकडील थकीत असलेला व चालू वर्षातील मालमत्ता कर, पाणीपट्टी भरणा करून महानगरपालिकेने हाती घेतलेल्या मोठ्या प्रमाणावरील विकास कामांस हातभार लावावा. आपल्या सहकार्याशिवाय शहराचा विकास शक्य होणार नाही.

या अर्थसंकल्पात दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणकारी योजनांसाठी विशेष तरतुद करण्यात आलेली असून सदरील तरतुद योग्यरित्या खर्ची पडण्याकरीता या योजनेचा सखोल अभ्यास असलेल्या विशेष अधिकारी यांची नियुक्ती सदर योजना यथायोग्यपणे राबविण्यासाठी करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 नुसार सन 2017-2018 चे सुधारीत अंदाज जमा रू.787 कोटी 45 लक्ष 55 हजार यामध्ये प्रारंभीची शिल्लक रू.62 कोटी 98 लक्ष 27 हजार असे एकूण जमा रू.850 कोटी 43 लक्ष, 82 हजार आणि एकूण खर्च रू.816 कोटी 43 लक्ष 60 हजार विचारात घेता रू.34 कोटी 00 लक्ष 22 हजार शिलकीचे सुधारित अर्थसंकल्पास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात येते.

उपरोक्तनुसार प्रशासनाने सादर केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये फेरफार, दुरूस्ती व वाढ करून सन 2018-2019 करीता महानगरपालिकेचे मुळ अंदाजपत्रक जमा रू.1442 कोटी 00 लक्ष 50 हजार यामध्ये प्रारंभीची शिल्लक रू.34 कोटी 00 लक्ष 22 हजार असे एकूण रू.1476 कोटी 00 लक्ष 72 हजार जमा यामध्ये रू.1475 कोटी 87 लक्ष 30 हजार खर्च विचारात घेता रू.13 लक्ष 42 हजार शिलकीच्या अर्थसंकल्पास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 96 नुसार सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 नुसार सन 2017-2018 चे सुधारित व सन 2018-2019 चे मुळ अर्थसंकल्प महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 100 अन्वये अंतिम मान्यतेसाठी मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद